भारतीय प्रशासन सेवेतील आणि राज्य शासकीय (वर्ग-१) च्या अधिकाऱ्यांना पुरेशी शासकीय विश्रामगृह व्यवस्था उपलब्ध करून देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-१०१६/प्र.क्र.७२७/२०१६/दहा,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
तारीख: १०.०५.२०१८

प्रस्तावना-

मंत्रालय/मुंबई येथे आयोजित शासकीय बैठकांकरिता उपस्थित राहणाऱ्या भारतीय प्रशासन सेवेतील आणि राज्य शासकीय (वर्ग-१) च्या अधिकाऱ्यांसाठी पुरेशी शासकीय विश्रामगृह व्यवस्था करण्याबाबत लेखी तसेच मौखिक विनंत्या शासनास प्राप्त झाल्या आहेत. तद्नुषंगाने गृहनिर्माण विभागांतर्गत म्हाडाकडे जुन्या उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासातून उपलब्ध झालेल्या काही सदनिकांचे म्हाडामार्फत नुतनीकरण/सुसज्जीकरण (furnishing) करून तसेच केटरिंग इत्यादीकरिता बाह्य यंत्रणांमार्फत निविदा मागवून विश्रामगृह व्यवस्था कार्यान्वित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. तसेच यासंदर्भात मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि. २३.११.२०१७ रोजी झालेल्या बैठकीत सदर कार्यवाही १) अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण), गृहनिर्माण विभाग २) अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग आणि प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा), वित्त विभाग या त्रिस्तरीय समितीच्या देखरेखीखाली पूर्ण करण्यात यावी असे ठरले होते. तद्नुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे,-

शासन निर्णय-

मंत्रालय/मुंबई येथील आयोजित शासकीय बैठकींकरिता उपस्थित राहणाऱ्या भाप्रसे अधिकाऱ्यांसाठी पुरेशी शासकीय विश्रामगृह व्यवस्था निर्माण करण्याच्या दृष्टीने गृहनिर्माण विभागांतर्गत म्हाडाकडे जुन्या उपकर प्राप्त इमारतींच्या पुर्नविकासातून उपलब्ध ताडदेव आणि माटुंगा येथील १४ सदनिका उपलब्ध करून देण्याकरिता आवश्यक ते Board Resolution संमत करण्यासंदर्भात तसेच विहित तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेसह सदर सदनिकांच्या सुसज्जीकरण (furnishing) आणि केटरिंगकरिता बाह्ययंत्रणांमार्फत निविदा प्रक्रीया राबवून विश्रामगृह व्यवस्था कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही म्हाडामार्फत (मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई-म्हाडा) दिनांक १५.०८.२०१८ पर्यंत पूर्ण करण्यात यावी.

२. सदर प्रस्तावित शासकीय विश्रामगृहाच्या १४ गाळ्यांची मालकी/व्यवस्थापन मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई (म्हाडा) यांचे राहील.

३. सदर विश्रामगृहाच्या व्यवस्थापनासाठी (केटरिंग, स्वच्छता इत्यादी) वार्षिक देखभाल कंत्राट (A.M.C.) देण्याकरिता मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई (म्हाडा) यांच्यामार्फत विहित निविदा प्रक्रीया राबविण्यात यावी.

४. वरीलप्रमाणे नुतनीकरण/सुसज्जीकरणाचे काम पूर्ण झाल्यावर सदर विश्रामगृहातील सदनिका/गाळ्यांचे आरक्षण संगणकीय प्रणालीद्वारे सामान्य प्रशासन विभाग कार्यासन १० च्या मार्फत करण्यात येईल.

५. सदर विश्रामगृह व्यवस्थेचे नाव -वरिष्ठ शासकीय अधिकारी अतिथिगृह असे राहील.

६. सदर विश्रामगृहातील गाळ्यांचे भाडे दर/शुल्क (प्रतिदिन) खालीलप्रमाणे राहील,-

१. शासकीय कामावर असल्यास (शुल्क प्रति कक्षबंध प्रतिदिन) - रू. ५००/-

२. शासकीय कामावर नसल्यास (शुल्क प्रति कक्षबंध प्रतिदिन) - रू. १,०००/-

७. आरक्षणासंदर्भातील अटी व शर्ती खालीलप्रमाणे असतील,-

१. विश्रामकक्षाचे आरक्षण करताना वरिष्ठतेनुसार अग्रक्रम देण्यात यावा.

२. कक्षबंध आरक्षित केलेल्या अधिकाऱ्यांनी विश्रामगृहात प्रवेशाच्यावेळी फोटोसह ओळखपत्राची छायांकित प्रत उपलब्ध करून देणे आवश्यक राहील. तसेच त्याची नोंदही नोंदणी रजिस्टरमध्ये करणे बंधनकारक राहील.

३. कक्षबंधाचे आरक्षण जास्तीत जास्त सात दिवसापर्यंत करण्यात यावे. सात दिवसांपेक्षा जास्त कालावधीसाठी निर्धारित दराच्या दुप्पट दराने शुल्क आकारण्यात यावे.

४. कक्षबंध वाटपासून २४ तासापर्यंत एक दिवस गणण्यात येईल. तसेच २४ तासांपेक्षा कमी वेळेसाठी एक दिवस गणला जाईल.

५. कक्षबंधामध्ये आरक्षण अहस्तांतरणीय राहील.

टिप- वरील शुल्क केवळ निवास व्यवस्थेवरील असून यामध्ये खानपान सेवा, लॉन्ड्री व अन्य शुल्कांचा अंतर्भाव नाही.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५१०१७०३५९५३०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Mukesh Khullar

Digitally signed by Mukesh Khullar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=GAD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6481e097db98eaae8b0580130544ebced12d1340cea24fcd0132235fb0c544a8, cn=Mukesh Khullar
Date: 2018.05.11 13:25:55 +05'30'

(मुकेश खुल्लर)
अपर मुख्य सचिव (सेवा)

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,
३. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
४. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव,
५. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,
६. महालेखापाल, मुंबई/नागपूर,
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२ मुंबई/नागपूर
८. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
९. सर्व भाप्रसे अधिकारी
१०. सर्व विभागीय आयुक्त
११. सर्व जिल्हाधिकारी,
१२. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,

१३. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,

१४. सर्व मुख्य लेखा व वित्त अधिकारी,

१५. सर्व मंत्रालयीन विभाग- आस्थापना अधिकारी यांनी वरील शासन निर्णय त्यांच्या विभागाच्या नियंत्रणाखालील अधिकाऱ्यांच्या निर्दशनास आणावा.

१६. कार्यासन-९,९-अ, १०-अ,

१७. निवड नस्ती.